९२९१/-

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३४४/प्रनिप्रा/२० ऑगस्ट/२०२४/५८५१. दिनांक : 21 AUG 2024

**बैठकीचे इतिवृत्त**

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दिनांक २० ऑगस्ट, २०२४ रोजी दुपारी १२:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **९०व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. मुरलीधर गोंविदराव चांदेकर, ख्यातनाम शिक्षणतज्ञ, २) डॉ. एन.एस. उमराणी, व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील ख्यातनाम तज्ञ, ३) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व ४) श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे १) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, २) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. व ३) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही त्यानुसार त्यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

विषय क्रमांक १ : प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०७/२०२४ व ३१/०७/२०२४ झालेल्या क्रमांक ८८ व ८९व्या बैठकींचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०७/२०२४ व ३१/०७/२०२४ रोजी झालेल्या क्रमांक ८८ व ८९व्या बैठकींचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले. तथापि, दिनांक ३०/०७/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ६(१) मधील निर्णयामध्ये खालील बाब स्पष्ट करण्यात येत आहे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर आरोग्य विज्ञान व आयुष शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी विशेष संवर्गातून तसेच संस्थात्मक / व्यवस्थापन / अनिवासी भारतीय कोटयातून (एनआरआय) प्रवेशित तसेच संस्था स्तरावरील करण्यात आलेल्या प्रवेशांची तपासणी / छाननी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरण स्तरावर अंतिम निर्णय निर्णय पारीत करण्यात येणार आहे. याबात सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

विषय क्रमांक २ : प्राधिकरणाच्या क्रमांक ८९व्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०७/२०२४ व ३१/०७/२०२४ रोजी झालेल्या क्रमांक ८८ व ८९व्या बैठकीच्या इतिवृत्तांनुसार प्राधिकरण कार्यालयाद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील प्रमाणे आहे,-

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | बैठक दिनांक : ३०/०७/२०२४ | |
| १. | १ | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०७/२०२४ व ३१/०७/२०२४ रोजी झालेल्या क्रमांक ८८ व ८९व्या बैठकींचे इतिवृत्त | प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०७/२०२४ व ३१/०७/२०२४ रोजी झालेल्या ८८ व ८९व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना दिनांक १९/०८/२०२४ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. |
| २. | ३ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी सीईटी कक्षाकडून घेण्यात आलेल्या सामाईक प्रवेश परीक्षा (CET) व घेण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) यांचा आढावा.<br>राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षा पूर्ण झालेल्या आहेत व तद्नुषंगाने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु झालेल्या आहेत. याबाबत आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी सविस्तर माहिती प्राधिकरणास अवगत केली.<br>याबाबत सीईटी कक्षातील सर्व संबंधित परीक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक यांनी अभ्यासक्रम-निहाय आढावा सादर केला व त्यानुसार सांगोपांग चर्चा करण्यात आली. प्रस्तूत प्रकरणी सीईटी कक्षाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये होणाऱ्या क्रेदीभूत प्रवेश प्रक्रियांचा दिनांक ३०/०७/२०२४ पर्यंतचा विभाग/अभ्यासक्रम-निहाय तपशील "प्रपत्र-अ" द्वारे सोबत जोडला आहे. | कार्यवाही पूर्ण झालेली आहे. |



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
नियामक प्राधिकरण,
राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ३. | ४ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियकरिता प्रवेश नियमावली / माहिती पुस्तिका यांचे अवलोकन करणे.<br><br>निर्णय / निर्देश : ज्या अभ्यासक्रमांची प्रवेश नियमावली / माहिती पुस्तिका अद्याप प्रसिध्द करण्यात आलेली नाही. अशा सर्व अभ्यासक्रमांच्या (प्रपत्र - क) प्रवेश नियमावली / माहिती पुस्तिका प्राधिकरणाच्या आगामी बैठकित माहितीस्तव सादर कराव्यात असे राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षास निर्देश देण्यात आले | सीईटी कक्षाकडून (प्रपत्र-क) मधील पदवी वैद्यकीय MH-NURSING CET-२०२४ व सहाय्यक परिचर्या प्रसाविका प्रशिक्षण (ए.एन.एम.ए. जी.एन.एम., डी.पी.एन. व पी.एच.एन.) या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या माहितीपुस्तिका प्राधिकरणास सादर केल्या आहेत. पदवी वैद्यकीय या माहिती पुस्तिकेतील पृष्ठ क्रमांक २१५ वरील अनिवासी भारतीय कोटयातील प्रवेशाबाबतचे प्रपत्र बदलुन प्राधिकरणाने दिनांक ३०/०७/२०२४ रोजीच्या विषय क्रमांक ५ मधील मुद्दा क्रमांक "इ"मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार दुरुस्ती करण्याबाबत निर्देश देण्यात आले. |
| ४. | ५ | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (५) (चार) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींचा व तद्नुषंगाने घेतलेल्या निर्णयाचा आढावा. | प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार १ जान्हवी प्रताप भोसले, २ साई संतोष काटेवाल, ३ तनवी दत्तात्रय जाधव यांचा प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे. त्यानुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या दिनांक ३०/०५/२०२४ रोजीच्या पत्राने संबंधिताना कळविण्यात आले आहे.<br><br>तसेच मुद्दा क्रमांक (आ) अन्वये प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार दिनांक २६/०७/२०२४ व १४/०८/२०२४ रोजीच्या पत्राने मा.प्रधान सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. |

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| **बैठक दिनांक : ३१/०७/२०२४** | | | |
| ५. | १ | माहे एप्रिल २०२४ ते जुन २०२४ या त्रैमासिक कालावधीतील प्राधिकरणाचे (सीईटी कक्षासह) आर्थिक लेखे प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ व मान्यतेकरिता सादर करणे<br><br>निर्णय / निर्देश : सदरचे लेखे काही किरकोळ दुरुस्तीसह फेर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. | प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार किरकोळ दुरुस्ती करुन लेखे सादर करण्यात आले. सदर प्रकरणी प्राधिकरणाने त्रैमासिक आर्थिक लेखाजोखा जमा-खर्चाच्या स्वरुपात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. |
| ६. | २ | Perusal and approval of the investment of funds of ARA and CET Cell - with details of Fixed Deposit/Savings A/Cs. and Current A/Cs. etc with various banks, locking period, dates of maturity and interests accured, etc.<br><br>निर्णय / निर्देश : अधिनियम, २०१५ मधील कलम १६ (४) च्या तरतुदीनुसार जास्तीत जास्त व्याज देणाऱ्या राष्ट्रीयीकृत बँकेत उपलब्ध निधी गुंतवण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. | प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही सुरु आहे. |
| ७. | ३ | प्राधिकरण कार्यालयामध्ये बाह्ययंत्रणेद्वारे निव्वळ कंत्राटी तत्वावर भरती करण्यात आलेल्या ०३ कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्याबाबत.<br><br>निर्णय / निर्देश : संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यालयातील कामाची निकड व कर्मचाऱ्यांचा कामाचा अहवाल पाहुन पुढील मुदत वाढ देण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी उचित कार्यवाही करावी व प्राधिकरणास तसे अवगत करावे, असे निर्देश देण्यात आले. | प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही सुरु आहे. |
| ८. | ४(क) (१) | १४१२५५५९ : महात्मा गांधी मिशनचे विधी महाविद्यालय, नवी मुंबई - विधी ३ वर्ष / २०२०-२१.<br><br>निर्णय / निर्देश : दंडात्मक कारवाई करुन ०१ विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता प्रदान करण्यात आली. | प्राधिकरणाच्या दिनांक १९/०८/२०२४ रोजीच्या स्वतंत्र पत्राद्वारे संबंधित महाविद्यालयाच्या प्रवेश मान्यतेबाबत व अनुषंगिक दंडात्मक कारवाईबाबत कळविण्यात आलेले आहे. |

(अ. नी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ९. | ४(क) (२) | १७०२ : विवा इन्स्टिटयुट ऑफ अप्लाईड आर्ट, विरार - पदवी कला / २०२०-२१.<br><br>निर्णय / निर्देश : दंडात्मक कारवाई रद्द करण्याबाबत महाविद्यालयाने केलेली विनंती नाकारण्यात आली.. | प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही सुरु आहे. |
| १०. | ४(क) (३) | १७०२ : १५०२ : डॉ. डी वाय पाटील कॉलेज ऑफ अप्लाईड आर्ट ॲण्ड क्राफ्ट, पुणे - पदवी कला / २०२०-२१.<br><br>निर्णय / निर्देश : दंडात्मक कारवाई रद्द करण्याबाबत महाविद्यालयाने केलेली विनंती नाकारण्यात आली. | प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही सुरु आहे. |
| ११. | ४(ख) (१) | १५१७२२४२ : श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे राजर्षी शाहु विधी महाविद्यालय, बार्शी - विधी ३ वर्ष / २०२०-२१.<br><br>निर्णय / निर्देश : संबंधित महाविद्यालयातील ०१ विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. | प्राधिकरणाच्या दिनांक १९/०८/२०२४ रोजीच्या स्वतंत्र पत्राद्वारे संबंधित महाविद्यालयाच्या प्रवेश मान्यतेबाबत कळविण्यात आलेले आहे. |
| १२. | ४(ख) (२) | २६८११०५३ : आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अहमदनगर - बी.एड / २०२०-२१<br><br>निर्णय / निर्देश : दंडात्मक कारवाई करुन ३५ विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता प्रदान करण्यात आली. | प्राधिकरणाच्या दिनांक १९/०८/२०२४ रोजीच्या स्वतंत्र पत्राद्वारे संबंधित महाविद्यालयाच्या प्रवेश मान्यतेबाबत व अनुषंगिक दंडात्मक कारवाईबाबत कळविण्यात आलेले आहे. |
| १३. | ४(ख) (३) | २६८११०५४ : छत्रपती शिवाजी महाराज शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जामखेड - बी.एड / २०२०-२१<br><br>निर्णय / निर्देश : दंडात्मक कारवाई करुन १५ विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता प्रदान करण्यात आली. | प्राधिकरणाच्या दिनांक १९/०८/२०२४ रोजीच्या स्वतंत्र पत्राद्वारे संबंधित महाविद्यालयाच्या प्रवेश मान्यतेबाबत व अनुषंगिक दंडात्मक कारवाईबाबत कळविण्यात आलेले आहे. |
| १४. | ४ (ग) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.<br><br>निर्णय / निर्देश : दंडात्मक कारवाई संबंधित महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता प्रदान करण्यात आली. | प्राधिकरणाच्या दिनांक १९/०८/२०२४ रोजीच्या स्वतंत्र पत्राद्वारे संबंधित महाविद्यालयाच्या प्रवेश मान्यतेबाबत व अनुषंगिक दंडात्मक कारवाईबाबत कळविण्यात आलेले आहे. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १५. | ४ (घ) | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया नेमणूक करण्यात आलेल्या सेवापुरवठादार मे. इडूस्पार्क इंटरनॅशनल प्रा.लि., मुंबई यांचे दर निश्चित करण्याबाबत.<br><br>निर्णय / निर्देश : प्रस्तूत प्रकरणी अधिनियम, २०१५ मधील कलम १०(६) प्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. | राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. |
| १६. | ४ (ङ) (१) | Learning And Testing Centre (LTC) संदर्भात आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी व संबंधित संचालक यांच्यासोबत करण्यात येणारा सामंजस्य कराराचा मसुदा अंतिम करुन प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. | प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही सुरु असुन दिनांक २१/०८/२०२४ रोजीच्या बैठकीत अंतिम मसूदा मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. |

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरण कार्यालयाद्वारे केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेऊन मान्य करण्यात आला. त्याचप्रमाणे ज्या निर्णयांमध्ये कार्यवाही अपूर्ण आहे, अशा प्रकरणी त्वरीत कार्यवाही करुन पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

<u>विषय क्रमांक ३ :</u> <u>महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५)(चार) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींचा व तदनुषंगाने घेतलेल्या निर्णयाचा आढावा. (वैद्यकीय शिक्षण, आयुष, होमिओपॅथी, नर्सिंग, कृषी व कला शिक्षण).</u>

केद्रींभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींबाबत प्राधिकरणाच्या दिनांक २१/०२/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु झालेल्या आहेत. या संदर्भात अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार सदरील प्रक्रिये दरम्यान हितसंबंधित घटकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी व तदनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केला <u>(प्रपत्र-अ)</u>. याबाबत सीईटी कक्षातील परीक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक (वैद्यकीय, आयुष, कृषी व कला) यांनी अभ्यासक्रम-निहाय आढावा सादर केला व त्यानुसार सांगोपांग चर्चा करण्यात आली. प्रस्तूत प्रकरणी सीईटी कक्षाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली, याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे,-

(के. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विभाग | एकुण प्राप्त तक्रारींची संख्या | सक्षम प्राधिकारी स्तरावर निराकरण केलेल्या तक्रारींची संख्या | संबंधित परिक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय शिक्षण | २१ | २१ | श्री. सिध्देश नर |
| २. | कला शिक्षण | निरंक | निरंक | श्री. पी.जे. कुमावत |
| ३. | कृषी शिक्षण | निरंक | निरंक | डॉ. एम.बी. निकम |
| | एकुण | २१ | २१ | -- |

वरील प्राप्त तक्रारींवर परिक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत सविस्तर सादरीकरण करुन त्यावर सांगोपांग चर्चा झाली.

<u>विषय क्रमांक ४</u> : **<u>Perusal of the MoU for 24 Learning & Testing Centres in Maharashtra</u>**

आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयांकित प्रकरणी सामज्यंस कराराचा अंतिम मसूदा दिनांक २१/०८/२०२४ रोजीच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात येणार असल्याचे नमूद केले.

<u>विषय क्रमांक ५:</u> <u>मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>

(क) <u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचा आढावा.</u>

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु झालेल्या आहेत. याबाबत आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी सविस्तर माहिती प्राधिकरणास अवगत केली.

याबाबत सीईटी कक्षातील सर्व संबंधित परीक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक यांनी अभ्यासक्रम-निहाय आढावा सादर केला व त्यानुसार सांगोपांग चर्चा करण्यात आली. प्रस्तूत प्रकरणी सीईटी कक्षाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
**अध्यक्ष,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.**

दिनांक : २८/८/२४